# ‘‘शेळ्या-मेंढ्यांमध्ये लहान वयात माद्या फळल्याने होणारे दुष्परिणाम व योग्य वयाआधी त्यांचे प्रजोत्पादन सुरू होऊ नये ह्यासाठी करावयाचे उपाय’’

### नका करू पाट फळवण्याची घाई
### नाही होता येणार लहान वयात तिला करडांची आई

शेळी–मेंढीपालक हे चांगल्या/पूरक उत्पन्नासाठी हा व्यवसाय करीत असतात. यासाठी उत्पादकदृष्ट्या चांगल्या गुणधर्माची व धष्टपुष्ट जनावरे तयार होणे महत्त्वाचे आहे. परंतु शेळी–मेंढी पालनातील व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष झाले तर शेळी–मेंढीपालकांना हवा तसा फायदा मिळू शकत नाही किंवा नुकसानीची झळ सोसावी लागते. शेळी–मेंढीपालक सहसा मालकीच्या सर्व शेळ्या–मेंढ्या एकाच कळपात ठेवतात व एकत्रच चारायला बाहेर नेतात. यामध्ये प्रौढ माद्या, पैदाशीसाठी राखलेला नर तसेच सर्व वयाची नर–मादी करडे/कोकरे यांचा समावेश असतो. पैदाशीच्या बाबतीत कोणतेच नियंत्रण ठेवले जात नाही. त्यामुळे पाटी/ल्हावरी ६–७ महिन्यांच्या वयात पहिल्यांदा/दुसऱ्यांदा माजावर आल्या की कळपात हजर असलेल्या पैदाशीच्या नरापासून किंवा विक्रीसाठी सांभाळलेल्या अर्धकच्च्या वयाच्या नरांपासून लगेच फळतात व गाभ जातात. लवकर फळलेल्या अशा माद्यांची पिल्ले सहसा हाताला लागत नाहीत व अशा माद्यांची उत्पादनक्षमताही कायमची कमी होते. त्यामुळे शेळी–मेंढी पालकांचे मोठे नुकसान होते.

## लहान वयात माद्या फळल्याने येणाऱ्या समस्या

१. कमी वयात फळणाऱ्या माद्यांची शारीरिक वाढ पूर्ण झालेली नसते व फळल्यानंतर ही वाढ खुंटते.
२. अशा पाटी/ल्हावरी पुढे कायमच बारकाळ व खुज्या राहतात.
३. कमी वय व वजन असणाऱ्या माद्यांपासून होणारी पिल्लेही आकाराने लहान, मरतुकडी व खुजट होतात.
४. शेळी/मेंढीला विताना त्रास झाल्यास अशी पिल्ले मरतात अथवा शेळी/मेंढी सुद्धा दगावू शकते.


**अखिल भारतीय समन्वित उस्मानाबादी शेळी सुधार प्रकल्प**
**पशुसंवर्धन विभाग**
NARI **निंबकर कृषि संशोधन संस्था** भाकृअनुप ICAR
फलटण ४१५ ५२३, जि. सातारा
ईमेल nimsheep@gmail.com
फोन ०२१६६-२६२१०६/२००७८३


डिसेंबर २०१५

५. शेळी/मेंढी व्यवस्थित व्यायली तरी ती बारकाळ असल्याने पिल्ले पोसण्याइतके दूध तिला नसते. याचा पिल्लांच्या वाढीवर परिणाम होऊन त्यामधून तयार होणाऱ्या माद्यांची उत्पादन क्षमता जन्मतःच आणखी कमी राहते.

६. लहान वयात फळलेल्या माद्यांपासून मिळणारी पैदास ही बारकाळ व खुजी असल्याने विक्रीयोग्य होण्यापूर्वी शेळी-मेंढी पालकांना त्यांचा दीर्घकाळ सांभाळ करावा लागतो तसेच पर्यायाने सांभाळण्याचा खर्चही वाढतो व त्यांना विकून मिळणारे उत्पन्नही कमी असते.

## योग्य वयाआधी शेळ्या-मेंढ्यांमधील माद्यांचे प्रजनन सुरू होऊ नये ह्यासाठी करायच्या उपाययोजना

१. माद्या शक्यतो वयाच्या ८-१० महिन्यांनंतर व किमान २० किलो वजनावर गेल्यानंतरच फळवाव्यात.

२. ठाणबंद शेळीपालनामध्ये लहान नर व माद्यांमधील संकर रोखण्यासाठी थानतुटीनंतर नर व मादी करडे वेगवेगळी काढावीत व नेहमी वेगवेगळ्या वाडग्यांमध्ये ठेवावी.

३. जी नर करडे पैदाशीसाठी राखायची नाहीत परंतु लवकर विकायची नाहीत त्यांचे वयाच्या तीन महिन्यांनंतर अथवा धष्टपुष्ट असल्यास लवकरच खच्चीकरण करावे. खच्चीकरणामुळे नर थोडेसे मांदालतात (शरिरातील चरबी वाढते) परंतु माद्यांच्या मागे लागायची त्यांना इच्छा होत नसल्याने ते मन लावून चरतात व त्यांची वाढ जास्त चांगल्या प्रकारे होते.

४. पैदाशीचा बोकड कळपात ठेवलेला असेल तर पाच महिन्यांपासून आठ ते दहा महिने वयाच्या होईपर्यंत पाटी कळपात न सोडता जागेवरच सांभाळाव्यात.

५. मादी जर कळपातून वेगळी काढणे शक्य नसल्यास पैदाशीसाठी ठेवलेल्या बोकडाला कळपाबरोबर नेताना कमरेला मऊ कापड (एप्रन) बांधावे. जेणेकरून तो पाठीमागे लागेल परंतु पाटींना फळवू शकणार नाही. माजावरील शेळी मात्र तो ओळखेल. अशा वेळी कापड काढून त्या बोकडाकडून माजावरील शेळी भरवून घ्यावी व परत त्याला कापड बांधावे. कळपातील इतर नर करडांचे खच्चीकरण करावे.

६. कळपातील नर करडे सहसा लवकर विकली जातात. त्यामुळे जर नर करडे थोडी असतील तर पाटी घरी ठेवण्याऐवजी ही नर करडे व (पैदाशीचा बोकड) घरी ठेवल्यास त्यांची वाढही चांगली होईल व पाटी फळण्याचा धोकाही टळेल.

७. करडे कायम कळपात असल्याने ती सतत शेळीला पितात व त्रास देतात. म्हणून अनेक शेळीपालक शेळीच्या सडांना कापडी चिंधी शेणात अथवा चिखलात भरवून बांधतात. परंतु यामुळे सडात दूध तुंबून राहिल्याने शेळीला त्रास होतो. तसेच घाणीमुळे जंतुसंसर्ग होऊन कासेचा आजार होण्याचा धोका संभवतो. यामुळे कासेला कापडी पिशवी बांधणे अधिक योग्य आहे. शिवाय थानतुटीनंतर करडे वेगळी काढून जागेवर ठेवल्यास फायदा होईल.